डॉ. नंदिनी धारगळकर

# न्युमरॉलॉजी

# संख्याशास्त्र



# न्युमरॉलॉजी(संख्याशास्त्र)

डॉ. नंदिनी धारगळकर

ई साहित्य प्रतिष्ठान

# न्युमरॉलॉजी(संख्याशास्त्र)

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे प्रकाशन कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा,व अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

न्युमरॉलॉजी(संख्याशास्त्र)

**Dr. Nandini Dhargalkar**

M.D. Ph. D. (Ayurved)

**Contact:** C/2 Anupam Complex, Karve Road, Kothrud, 411038

**Phone**: 7020511649, 9579031212

**Mail ID**: nan240950@gmail.com

**SHARADINI DAHANUKAR BEST TEACHER AWARD WINNER 2006**

(MUHS Nashik)

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २५ मे २०२०

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

## या पुस्तकात व्यक्त केलेल्या लेखिकेची मते व्यक्तिगत असून त्या मतांशी प्रकाशक सहमत असतीलच असे नाही

## डॉ. नंदिनी धारगळकर



### लेखिकेची थोडक्यात ओळख


- Ex-**Principal**, Rasiklal. M. Dariwal Ayurvedic college, Valsad, Gujarat 396375
- Ex-**Dean**, RMD Cancer Hospital, Waghaldhara, Valsad, Gujarat
- Ex-**H.O.D**. Sharira-Kriya Dept. Tilak Ayurved Mahavidyalaya, Pune
- Ex-Member, Adhock Committee, MUHS, Nashik
- Ex-Member, Academy, UG & PG, Para-clinical board, MUHS, Nashik
- Ex-Senior Vice Principal, Tilak Ayurved Mahavidyalaya, Pune
- Examiner & paper setter for UG & PG for last 32 years, Pune University & MUHS, Nashik
- Chief Co-ordinator, Autonomous Courses, ASM, Pune
- Academic faculty and Guide for UG and PG for Pune University & for MUHS


- Ph.D. Guide MUHS, Nashik
- Author of CCIM approved Sharira-Kriya book published by Chaukhambha Sanskrit Series Office, Varanasi
- CCIM syllabus setting 2010-12
- Professor Shrarir-Kriya till 2015 in ASM Pune
- Private consultancy on appointment from 2015 till date for alternative therapy on cardiac diseases


नंदिनी धारगळकर यांची ई साहित्यने प्रकाशित केलेली इतर पुस्तके


1. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/mi_kay_khau_nandini.pdf
2. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/japani_bhasha_nandini_dhargalkar.pdf
3. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/japanai_bhasha_2_nandini_dhargalkar.pdf
4. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/prashna_jyotish_nandini_dhargalkar.pdf
5. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/mani_art__maneesha_devale.pdf
6. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/homeopathy_dr_nandini_dhargalkar.pdf
7. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/panchvishati_nandini_dhargalkar.pdf


डॉ. नंदिनी धारगळकर
प्रश्नज्योतिष


डॉ. नंदिनी धारगळकर
नह्लिदत्तकृत
पञ्चविशति


डॉ. नंदिनी धारगळकर
होमिओपॅथी
तुमच्या दारी


घरीच बनवा क्रिस्टल मण्यांचा
कंदिल
व
इतर वस्तु
निर्मिती
सौ. मनीषा दीपक देवळे
शब्दांकन
डॉ. नन्दिनी धारगळकर


डॉक्टर,
मी काय खाऊ?
डॉ. नंदिनी धारगळकर


डॉ. नंदिनी धारगळकर
मैत्री
जपानी
भाषेशी


डॉ. नंदिनी धारगळकर
मैत्री
जपानी
भाषेशी
2

# न्युमरॉलॉजी(संख्याशास्त्र)

# व नावातील बदल

## मनोगत

संख्याशास्त्रावर लोकांचा किती विश्वास आहे याची कल्पना नाही. परंतु मी खुप जणांना स्वत:च्या नावात संख्याशास्त्राच्या नियमांप्रमाणे छोटे छोटे बदल करतांना पाहिले आहे.

मी शास्त्रोक्त वैदिक ज्योतिष शिकले आहे. त्यामुळे न्युमरॉलॉजी अथवा संख्याशास्त्र हे मला व्यापक वाटले नाही. परंतु नामबदलाचे नियम त्यामानाने सोपे वाटल्याने या पुस्तकात ते मी अतिशय सहज समजतील असे मांडले आहेत.

ज्यांना अशा प्रकारे स्वत:च्या नावात बदल करावयाचे असतील त्यांनी सदर पुस्तकाचा जरूर उपयोग करून घ्यावा

डॉ नंदिनी धारगळकर

* एक्स डीन आर एम् डी कॅन्सर हॉस्पिटल
* ॲडजंक्ट मेडिकल फॅकल्टी ओरेगॉन, यु एस ए
* फोन +९१ ७०२०५ ११६४९

# प्रकरण १ ओळख

आकडयांचा आपल्या आयुष्याशी अगदी जवळचा संबंध आहे. आपण जन्माला ज्या दिवशी येतो त्या तारखेचे महत्व वाढदिवस साजरा करण्यापुरते मर्यादित नाही. संख्याशास्त्रानुसार या तारखेवर आपल्या अनेक गोष्टी अवलंबून असतात. तसेही प्रत्येकाला आपले भविष्य काय असेल, आपल्याला कितपत यश येईल, इत्यादि बाबींचे कुतूहल असते.

ज्योतिषशास्त्र या सर्व प्रश्नांची कुंडली अचूक असेल तर नक्कीच अचूक उत्तरे देते. पण त्यासाठी जन्मतारीख, जन्मवेळ व जन्मठिकाण माहित असावे लागते.

संख्याशास्त्राचे तसे नाही. केवळ तारीखेवरून अनेक बाबींचे ज्ञान हे शास्त्र करून देते. आता प्रश्न येतो एका दिवशी अनेक जण जन्माला येतात. त्या सर्वांचे भविष्य सारखेच असते का?

पण त्यांची नावे तर वेगवेगळी असतात. तेव्हा नावाचा आणि तारखेतून व्यक्त होणाऱ्या गुणधर्मांचा विचार आपल्याला या पुस्तकात करावयाचा आहे.

यासाठी आपल्याला कशाकशाचा अभ्यास करावा लागेल?

१. प्रत्येक संख्येचा अर्थ
२. वाढदिवसाच्या तारखेतून व्यक्त होणारी संख्या
३. नावातून व्यक्त होणारी संख्या

आपण प्रत्येक मुद्याचा विचार करू.

प्रत्येक संख्येचा विचार करण्याआधी मूलांक म्हणजे काय, भाग्यांक म्हणजे काय, जन्मतारखेची स्पन्दने तसेच नावावरून येंणारी संख्या याची ओळख करून घेणे इष्ट ठरेल.

# प्रकरण २ मूलांक

मूलांक याचा अर्थ:

जन्मदिवसाच्या तारखेच्या संख्येची बेरीज म्हणजे मूलांक.

उदा. समजा,

१. जन्मतारीख ०१. ०१. २०२० आहे. तर त्या व्यक्तीचा मूलांक ० + १ = १ आहे
२. जन्मतारीख ३१. ०१. २०२० आहे. तर त्या व्यक्तीचा मूलांक ३ + १ = ४ आहे
३. जन्मतारीख २९. ०१. २०२० आहे. तर त्या व्यक्तीचा मूलांक २ + ९ = ११ = १ + १ = २ आहे

तर मूलांक एक ते नऊ यांपैकी एक आकडा येतो.

आता आपण यापैकी कोणताही आकडा आल्यास व्यक्तीवरील त्याचा परिणाम पाहू.

## नावातला बदल आणि संख्याशास्त्र

::::::::::::::::::::::::::::::::

आकडयाचा प्रभाव व्यक्तीवर पडतो कारण प्रत्येक आकडा ग्रहाशी निगडीत आहे

तो असा:

| आकडा | ग्रह |
|---|---|
| १ | सूर्य |
| २ | चन्द्र |
| ३ | गुरु |
| ४ | हर्षल |
| ५ | बुध |
| ६ | शुक्र |
| ७ | नेपच्युन |
| ८ | शनि |
| ९ | मंगळ |

## मूलांक १

या व्यक्तीवर सूर्यदेवाचा अर्थात् रविग्रहाचा प्रभाव असतो. वैशिष्टयाने २१ जुलै ते २८ ऑगस्ट या दरम्यान जन्माला येणारी व मूलांक १ असणारी व्यक्ती तर अधिकच सूर्यप्रभाव असलेली असते.

अशी व्यक्ती बुद्धिमान, निश्चयी, क्रियात्मक, स्थिर स्वभावाची, नेता, नवनवीन कल्पनेची व चिकाटीची असते.

याच्याच जोडीला अशी व्यक्ती अहंकार, गुर्मी व गर्व यांनी ग्रसित असते.

कोणत्याही महिन्याच्या पुढील तारखेला जन्मलेली व्यक्ती मूलांक १ असलेली असते

१, १०, १९, २८

या व्यक्तींना पुढील आकडे शुभ असतात.

२, ४, ७

## मूलांक २

या व्यक्तीवर सोमदेवाचा अर्थात् चन्द्रग्रहाचा प्रभाव असतो. वैशिष्टयाने २० जून ते २५ जुलै या दरम्यान जन्माला येणारी व मूलांक २ असणारी व्यक्ती तर अधिकच चन्द्रप्रभाव असलेली असते.

अशी व्यक्ती कलाप्रिय, प्रेमळ, मनमिळावू, अस्थिर स्वभावाची, संवेदनाशील, व काहीशी राजकारणी असते.

याच्याच जोडीला अशी व्यक्ती कोते मन, लाजाळूपणा नकारात्मकता यांनी ग्रसित असते.

कोणत्याही महिन्याच्या पुढील तारखेला जन्मलेली व्यक्ती मूलांक २ असलेली असते

२, ११, २०, २९

या व्यक्तींना पुढील आकडे शुभ असतात.

१, ४, ७

## मूलांक ३

या व्यक्तीवर बृहस्पतीचा अर्थात् गुरुग्रहाचा प्रभाव असतो. वैशिष्टयाने १९ फेब्रुआरी ते २१ मार्च या दरम्यान जन्माला येणारी व मूलांक ३ असणारी व्यक्ती तर अधिकच गुरुप्रभाव असलेली असते.

अशी व्यक्ती महत्वाकांक्षी, राजनीतीज्ञ, शासनकर्ती असते.

याच्याच जोडीला अशी व्यक्ती अतिशयोक्ती, अपूर्ण कामे स्वकेंद्रितता यांनी ग्रसित असते.

कोणत्याही महिन्याच्या पुढील तारखेला जन्मलेली व्यक्ती मूलांक ३ असलेली असते

३, १२, २१, ३०

या व्यक्तींना पुढील आकडे शुभ असतात.

६, ९,

## मूलांक ४

या व्यक्तीवर हर्षलग्रहाचा प्रभाव असतो. वैशिष्टयाने २१ जून ते ३१ ऑगस्ट या दरम्यान जन्माला येणारी व मूलांक ४ असणारी व्यक्ती तर अधिकच हर्षलप्रभाव असलेली असते.

अशी व्यक्ती सुधारक, नवसंस्थापक, शासक, नवविचाराची असते.

याच्याच जोडीला अशी व्यक्ती हट्ट, ठराविक मते व वादविवाद यांनी ग्रसित असते.

कोणत्याही महिन्याच्या पुढील तारखेला जन्मलेली व्यक्ती मूलांक १ असलेली असते

४, १३, २२, ३१

या व्यक्तींना पुढील आकडे शुभ असतात.

१, २, ७, ८

## मूलांक ५

या व्यक्तीवर बुधग्रहाचा प्रभाव असतो. वैशिष्टयाने २१ ऑगस्ट ते २३ सप्टेंबर या दरम्यान जन्माला येणारी व मूलांक ५ असणारी व्यक्ती तर अधिकच बुधप्रभाव असलेली असते.

अशी व्यक्ती चौफेर बुद्धिमान, कोणाशीही लगेच मैत्री करणारी मनमिळावू अशी असते.

याच्याच जोडीला अशी व्यक्ती अस्वस्थता, असमाधान शीघ्रकोप यांनी ग्रसित असते.

कोणत्याही महिन्याच्या पुढील तारखेला जन्मलेली व्यक्ती मूलांक ५ असलेली असते

५, १४, २३

या व्यक्तींना पुढील आकडे शुभ असतात.

वैशिष्टयाने ५ अथवा कोणताही मूलांक

## मूलांक ६

या व्यक्तीवर शुक्रग्रहाचा प्रभाव असतो. वैशिष्टयाने २० एप्रिल ते २४ मे व २१ सप्टेंबर ते २४ ऑक्टोबर या दरम्यान जन्माला येणारी व मूलांक ६ असणारी व्यक्ती तर अधिकच शुक्रप्रभाव असलेली असते.

अशी व्यक्ती कलाप्रिय, चिकाटीने काम करणारी, सर्वांना आवडणारी जबाबदारी जाणणारी असते.

याच्याच जोडीला अशी व्यक्ती हट्ट, ईर्षा, स्पर्धा यांनी ग्रसित असते.

कोणत्याही महिन्याच्या पुढील तारखेला जन्मलेली व्यक्ती मूलांक १ असलेली असते

६, १५, २४

या व्यक्तींना पुढील आकडे शुभ असतात.

३, ६, ९

## मूलांक ७

या व्यक्तीवर नेपच्युनग्रहाचा प्रभाव असतो. वैशिष्टयाने २१ जून ते २५ जुलै या दरम्यान जन्माला येणारी व मूलांक ७ असणारी व्यक्ती तर अधिकच नेपच्युनप्रभाव असलेली असते.

अशी व्यक्ती विश्लेषणात्मक, संशोधक, चित्रकलाप्रिय, काव्यप्रिय असते.

याच्याच जोडीला अशी व्यक्ती एकलकोंडा व आत्मकेंद्रित व न बदलणारा स्वभाव यांनी ग्रसित असते.

कोणत्याही महिन्याच्या पुढील तारखेला जन्मलेली व्यक्ती मूलांक १ असलेली असते

७, १६, २५

या व्यक्तींना पुढील आकडे शुभ असतात.

१, २, ४

## मूलांक ८

या व्यक्तीवर शनिग्रहाचा प्रभाव असतो. वैशिष्टयाने २१ डिसेंबर ते १९ फेब्रुवारी या दरम्यान जन्माला येणारी व मूलांक ८ असणारी व्यक्ती तर अधिकच शनिप्रभाव असलेली असते.

अशी व्यक्ती राजकारणी, शासनकर्ती, कठीण आयुष्य जगणारी, कोणतेही काम पूर्ण करणारी अशी असते.

याच्याच जोडीला अशी व्यक्ती सतत उद्योग, वेडी महत्वाकांक्षा व ताणतणाव यांनी ग्रसित असते.

कोणत्याही महिन्याच्या पुढील तारखेला जन्मलेली व्यक्ती मूलांक १ असलेली असते

८, १७, २६

या व्यक्तींना पुढील आकडे शुभ असतात.

२, ४, ७

## मूलांक ९

या व्यक्तीवर मंगळग्रहाचा प्रभाव असतो. वैशिष्टयाने २१ मार्च ते २७ एप्रिल व २१ ऑटोबर ते २७ नोव्हेंबर या दरम्यान जन्माला येणारी व मूलांक ९ असणारी व्यक्ती तर अधिकच मंगळप्रभाव असलेली असते.

अशी व्यक्ती नि:स्वार्थी, उदार, सृजनशील, निश्चयी व हुकुमत करणारी असते.

याच्याच जोडीला अशी व्यक्ती लहरी, स्वत:चा ताबा ठेवणारी व अनाठायी खर्चिक अशा प्रकारच्या स्वभावाने ग्रसित असते.

कोणत्याही महिन्याच्या पुढील तारखेला जन्मलेली व्यक्ती मूलांक ९ असलेली असते

९, १८, २७

या व्यक्तींना पुढील आकडे शुभ असतात.

३, ६

## नावाचे विश्लेषणः

नाव व नंबर यांचा संबंध पुढीलप्रमाणे –

| इंग्रजी अक्षर | | | आकडा |
|---|---|---|---|
| ए | जे | एस | १ |
| बी | के | टी | २ |
| सी | एल | यू | ३ |
| डी | एम | व्ही | ४ |
| ई | एन | डब्ल्यू | ५ |
| एफ | ओ | एक्स | ६ |
| जी | पी | वाय | ७ |
| एच | क्यू | झेड | ८ |
| आय | आर | | ९ |

या तालिकेवरून आपल्याला आपल्या नावाचे विश्लेषण करावयाचे आहे

त्यासाठी आवश्यक:

- स्वत:च्या नावाचे इंग्रजी अक्षरात रूपांतर करावे
- प्रत्येक अक्षर व त्याचा संबंधित आकडा तालिकेत लिहावा
- पूर्ण नावाच्या अक्षरांच्या आकडयांची बेरीज करावी
- सर्व स्वरांच्या आकडयांची बेरीज करावी
- सर्व व्यंजनांच्या आकडयांची बेरीज करावी

तीन प्रकारचे आकडे मिळतात

- व्यक्तांक – पूर्ण नावाच्या अक्षरांच्या आकडयांची बेरीज

- अन्तरांक / बौद्धिकांक – सर्व स्वरांची बेरीज
- व्यक्तिमत्वांक – सर्व व्यंजनांची बेरीज

<u>व्यक्तांक</u>

आई वडील जे नाव देतात व बाळ जन्माला आल्यावर जे नाव ठेवतात तेच नाव इथे आकडयांच्या बेरजेसाठी घ्यावे

एकादे बाळ जर दत्तक गेले असेल तर ते नाव घ्यावे.

या नावाच्या आकडयांच्या बेरजेनंतर जो अंक येतो तो व्यक्तीची मूळ ताकद दर्शवितो

<u>अन्तरांक</u>

अन्तरीक ऊर्मी, माणसाची महत्वाकांक्षा अशा गोष्टी या नावातील स्वरांच्या बेरजेने समजते

व्यक्तिमत्वांक

माणूस बाहेरून कसा दिसतो, त्याचे दर्शन कसे आहे हे या अंकावरून समजते

एकादे उदाहरण घेतले म्हणजे हे सहज लक्षात येईल

**आपले पंतप्रधान नरेन्द्र दामोदर मोदी**

आपल्या पंतप्रधानांचे व्यक्तांक:

| इंग्रजी अक्षर | आकडा |
|---|---|
| एन | ५ |
| ए | १ |
| आर | ९ |
| ई | ५ |
| एन | ५ |
| डी | ४ |

| | |
|---|---|
| आर | ९ |
| ए | १ |

| | |
|---|---|
| डी | ४ |
| ए | १ |
| एम | ४ |
| ओ | ६ |
| डी | ४ |
| ए | १ |
| आर | ९ |

| | |
|---|---|
| एम | ४ |
| ओ | ६ |

| | |
|---|---|
| डी | ४ |
| आय | ९ |

एकूण ९१ = ९ + १ = १०

= १ + ० = १

आपले पंतप्रधान निश्चयी, ठाम विचारांचे, नेतृत्वगुणसंपन्न, जबाबदार असेच वाटतात

आपल्या पंतप्रधानांचे अन्तरांक

| इंग्रजी अक्षर | आकडा |
|---|---|
| ए | १ |
| ई | ५ |
| ए | १ |

| | |
|---|---|
| ए | १ |
| ओ | ६ |
| ए | १ |
| ओ | ६ |
| आय | ९ |

एकूण ३० = ३ + ० = ०३

अशी व्यक्ती महत्वाकांक्षी, राजनीतीज्ञ, शासनकर्ती असते की जे वर्णन आपल्या पंतप्रधानांना चपखल लागू पडते

व्यक्तिमत्वांक

| इंग्रजी अक्षर | आकडा |
|---|---|
| एन | ५ |

| | |
|---|---|
| आर | ९ |
| एन | ५ |
| डी | ४ |
| आर | ९ |

| | |
|---|---|
| डी | ४ |
| एम | ४ |
| डी | ४ |
| आर | ९ |

| | |
|---|---|
| एम | ४ |
| डी | ४ |

एकूण ६१ = ६ + १ = ७

आपले पंतप्रधान दर्शनी प्रसन्न, उमदे, नेता, उत्तम शासक, असेच दिसतात

काहीसे एकलकोंडे व्यक्तिमत्व, किंचित अबोलपणा म्हणजे बोलण्यापेक्षा करून दाखविण्याकडे कल असे त्यांचे व्यक्तिमत्व खरेच आहे

| | | |
|---|---|---|
| यांचा व्यक्तांक | १ | ७ शत्रु |
| अन्तरांक | ३ | |
| व्यक्तिमत्वांक | ७ | १ शत्रु |

त्यांचा व्यक्तांग व व्यक्तिमत्वांग यात फरक आहे. त्यांना प्रदर्शन करणे, भाव खाणे, वरवर दाखविणे यात कधीही स्वारस्य वाटले नाही. भारी कपडे घालण्यापेक्षा टापटीप व स्वच्छ कपडे त्यांना आवडतात

या वरून असे दिसते की संख्याशास्त्राचे हे विश्लेषण योग्य असेच आहे

याला पुरवणी म्हणून पुढील तालिकेचा उपयोग होऊ शकतो

आता आपण हे पाहू की मूलांक व शत्रु अथवा मित्र यांचा संबंध काय:

| मूलांक | शत्रु | मित्र |
|---|---|---|
| १ | ६, ७ | ४, ८ |
| २ | ५ | ७, ९ |
| ३ | ४, ८ | ५, ६, ९ |
| ४ | ३, ६ | १, ८ |
| ५ | २, ४ | ३, ९ |
| ६ | १, ८ | ३, ९ |
| ७ | १, ९ | २, ६ |

| | | |
|---|---|---|
| ८ | ३, ६ | १, ४ |
| ९ | ७ | २, ३, ६ |

नावाचे व आकडयांचे विश्लेषण झाल्यावर आता जन्मतारीख, मूलांक आणि भाग्यांकाकडे पुन्हा वळणे आवश्यक आहे

मूलांक

म्हणजे केवळ तारखेच्या आकडयांची बेरीज

भाग्यांक

म्हणजे संपूर्ण जन्मतारखेच्या आकडयांची बेरीज अर्थात तारीख, महिना व वर्ष या सर्व आकडयांची बेरीज

आपल्या पंतप्रधानांची जन्मतारीख

१७ . ०९ . १९५०

त्यांचा मूलांक

१ + ७ = ८

त्यांचा भाग्यांक

१ + ७ + ९ + १ + ९ + ५ + ०

= ३२ = ३ + २ = ५

आपण त्यांच्या सर्व अंकांची तालिका तयार करू

| | | शत्रु |
|---|---|---|
| मूलांक | ८ | ३,६ |
| भाग्यांक | ५ | २,४ |
| यांचा व्यक्तांक | १ | ६,७ |
| अन्तरांक | ३ | ४,८ |
| व्यक्तिमत्वांक | ७ | १ |

या तालिकेत असे दिसते की त्यांचा मूलांक बदलू शकत नाही पण अन्तरांक की जो मूलांकाचा शत्रु आहे तो बदलू शकतो

समजा आपण नरेन्द्र या शब्दाचे स्पेलिंग बदलून पुढीलप्रमाणे लिहिले

| इंग्रजी अक्षर | आकडा |
|---|---|
| एन | ५ |
| ए | १ |
| आर | ९ |
| ई | ५ |
| एन | ५ |
| डी | ४ |
| ई | ५ |
| आर | ९ |

| | |
|---|---|
| डी | ४ |
| ए | १ |
| एम | ४ |
| ओ | ६ |
| डी | ४ |
| ए | १ |
| आर | ९ |

| | |
|---|---|
| एम | ४ |
| ओ | ६ |
| डी | ४ |
| आय | ९ |

एकूण ९५ = ९ + ५ = १४

= १ + ४ = ५

तर त्यांचा व्यक्तांक ५

अन्तरांक ७

व्यक्तिमत्वांक ७

असा बनतो व मूलांक, भाग्यांक, व्यक्तांक, अन्तरांक व व्यक्तिमत्वांक एकमेकांना शुभ बनतात.

असे झाले तर त्यांचा आयुष्यातील व राजकारणातील संघर्ष कमी होऊ शकतो.

अशा रीतीने नावातील छोटया छोटया बदलाने आपण आयुष्य वेगळया पद्धतीने जगू शकतो

## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १२ वे वर्ष.

## डॉ. नंदिनी धारगळकर यांचे हे आठवे पुस्तक.

डॉ. नंदिनी धारगळकर या एक ज्येष्ठ लेखिका. अनेक विषयांत त्यांचा अत्यंत सखोल अभ्यास आहे. मेडिकल फ़िल्दमधील व्यक्ती असल्यामुळे त्यांनी सर्वसामान्यांना उपयुक्त अशी मेडिकलच्या विषयातली सोपी पुस्तके लिहीली. तसेच ज्योतिष, कला या विषयांवरही अत्यंत अभ्यासपूर्ण पुस्तके लिहीली. त्यांना ही पुस्तके जास्तीत जास्त लोकांपर्यंत न्यायची होती म्हणून त्यांनी ई साहित्य हे माध्यम निवडले. एकाही पैशाची अपेक्षा न ठेवता त्यांनी उदार हस्ते ही पुस्तके आमच्या लाखो वाचकांना दिली. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (१६ पुस्तके), शुभांगी पासेबंद (८ पुस्तके), अविनाश नगरकर (चार पुस्तके), नासा येवतीकर(७), डॉ. स्मिता दामले (९ पुस्तके), डॉ. नितीन मोरे (२४ पुस्तके), अनील वाकणकर (६ पुस्तके), रत्नाकर महाजन

(४ पुस्तके),  अनंत पावसकर(चार पुस्तके), मधू शिरगांवकर (३), अशोक कोठारे (१० हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी ( आद्य गझलकारा, १२ पुस्तके), विनीता देशपांडे (७ पुस्तके), उल्हास हरी जोशी(६), नंदिनी देशमुख (५), सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(१२), डॉ. नंदिनी धारगळकर(८) संयम बागायतकर(२), मीना खोंड(१)  असे अनेक ज्येष्ठ, अनुभवी लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत पोहोचवतात. एकही पैशाची अपेक्षा न ठेवता.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपले नाव नेऊन ठेवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं 'इ'यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।